Newspaper: Maharashtra Times

Article Date: 25th October, 2017

**Post Event Article**

# वाचताय ना? वाचायलाच पाहिजे!

अस्मिता जाधव, पोदार कॉलेज
muntainbox@gmail.com




**पोदारचा उपक्रम**

वाचनाची सवय कमी होत चाललीय असं हल्ली वारंवार म्हटलं जातं. पण तरुण वाचकांमधली वाचनाची आवड वाढावी यासाठी जाणीवपूर्वक काही प्रयत्न केले जात आहेत. पोदार कॉलेजच्या हॉबी सर्कलतर्फे राबवला जाणारा 'बुकोफाइल' हा उपक्रम म्हणजे त्यातलंच एक उदाहरण. या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना हवी असलेली पुस्तकं त्यांना वाचण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत, तीही एकदम मोफत.

दिवाळीची सुट्टी सुरू होण्यापूर्वी हॉबी सर्कलनं कॉलेजच्या विद्यार्थ्यांना, तुम्हाला कोणती पुस्तकं वाचायला आवडतील त्यांची नावं सांगा असं आवाहन केलं होतं. त्यानुसार एकूण ५० पुस्तकं दिली जाणार होती. सर्कलचे सदस्य असलेल्या विद्यार्थ्यांकडील पुस्तकं यात दिली जातात. किंवा काही पुस्तकं नवीनही आणली जातात. विद्यार्थ्यांनी पुस्तकांची नावं देताच हिंदी, मराठी, इंग्रजी अशी ५० पुस्तकं त्यांना उपलब्ध करून देण्यात आली. साधारणतः एक महिन्यानंतर मुलांनी ही पुस्तकं परत करायची आहेत. पुस्तक नेण्यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडे असलेलं एक पुस्तक हॉबी सर्कलकडे डिपॉझिट म्हणून ठेवायचं होतं. विद्यार्थ्यांनी त्या पुस्तकाबद्दलची प्रतिक्रिया सांगावी यासाठी त्यांना एक कार्डही देण्यात आलं आहे. गेली तीन वर्षं हा उपक्रम सुरू असून, त्याला तरुण वाचकांचा उत्तम प्रतिसाद मिळतोय असं हॉबी सर्कलकडून सांगण्यात आलं.